


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २२ डिसेंबर २०२४ | अंक१३० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## कमलबाई किशन ईबितवार यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : उमरा ता.लोहा येथील जेष्ठ महिला नागरिक कै.कमलबाई किशन ईबितवार (वय ९० वर्षे) यांचे दि.२१-डिसेंबर रोजी शनिवार रात्री ७ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.२२-डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै.कमलबाई ईबितवार यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी नातू,पणतू असा परिवार असून बाबुराव ईबितवार यांची आई तर मारोती,ईबितवार,नागेश ईबितवार यांच्या त्या आजी होत.



केज तालुक्यातील मस्साजोग येथील येथील सरपंच स्व.संतोषअण्णा देशमुख यांच्या कुटुंबियांची राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी सांत्वनपर भेट घेतली. याप्रसंगी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांची उपस्थिती होती.



आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाला नाईक तांडा तालुक्याचे भाग्यविधाते बाळराजे {दादा}पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आयोजक महादेव गाढे ग्रामपंचायत सदस्य बाला नाईक तांडा गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते आदरणीय दैवत श्री बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत बाला नाईक तांडा येथे सामाजिक उपक्रम म्हणून जि प शाळा बाला नाईक तांडा येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले गावातील उपस्थित महादेव गाढे महादेव वडते सुभाष चव्हाण रमेश राठोड संकेत खेडकर तसेच शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री गरकळ सर बारगजे सर ज्ञानेश्वर सांगळे सर शाळेचे विद्यार्थी इत्यादी

# बीडच्या खंडणी पॅटर्नला बसेल का आळा? बारगळ यांची उचलबांगडी, नवे पोलीस अधीक्षक कोण? ठरतील का सिंघम?

## बीड जिल्हा खंडणी पॅटर्न, पीक विमा घोटाळा पॅटर्न, गावगुंड पॅटर्न यामुळे राज्यातच नाही तर देशाच्या केंद्रस्थानी आला आहे.

**बीड ,/प्रतिनिधी**

वाढती गुन्हेगारी, दहशत आणि अराजकतेमुळे बीड राज्याच्याच नाही तर देशाच्या नकाशावर आले आहे. विधानसभेत रोज बीड जिल्ह्यातील एका एका प्रकरणाचा उलगडा करण्यात आला. विरोधकच नाही तर सत्ताधारी पक्षांच्या आमदारांनीच त्याचा भांडाफोड केल्याने बीड राज्यातील बिहार झालंय का? असा प्रश्न विचारण्यात येत आहे. त्यातच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडची कायदा आणि सुव्यवस्था ऐरणीवर आली होती. प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तडकाफडकी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची उचलबांगडी करण्याची आणि त्यांच्या जागी नवीन पोलीस अधीक्षक नियुक्तीची घोषणा केली होती. बीड पोलीस अधीक्षकपदी नवनीत कॉवत यांची नियुक्ती केली. कोण आहेत कॉवत, ते जिल्ह्यात ठरतील का सिंघम? असा सवाल करण्यात येत आहे.



बारगळ यांची उचलबांगडी, कॉवत यांची नियुक्ती बीड जिल्हा खंडणी पॅटर्न, पीक विमा घोटाळा पॅटर्न, गावगुंड पॅटर्न यामुळे राज्यातच नाही तर देशाच्या केंद्रस्थानी आला आहे. पवनचक्की येथील लोकांना झालेल्या वादानंतर संतोष देशमुख यांची आरोपींनी निर्घृण हत्या केली होती. याप्रकरणी पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उभं करण्यात आलं होते. आरोपींना पोलीसच अभय देत असल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात अजून काही मोठे मासे आणि प्रत्यक्ष घटनेतील आरोपी अद्यापही फरार आहेत. विरोधकांनी विधानसभा दणाणून सोडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सरकारची बाजू मांडली. त्यांनी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची उचलबांगडी करण्याची आणि नवीन पोलीस अधीक्षक नियुक्तीचे आदेश दिले होते. त्यानुसार, २४ तासात या पदावर नवनीत कॉवत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कॉवत हे सध्या छत्रपती संभाजीनगरमध्ये पोलीस उपायुक्त म्हणून काम पाहत आहेत.कोण आहेत डझ नवनीत कॉवत? नवनीत कॉवत हे २०१७ मधील बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. कॉवत हे मूळचे राजस्थान येथील रहिवाशी आहेत. त्यांनी आयआयटीमधून बीटेक पदवी घेतली आहे. त्यांनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर खासगी कंपनीमध्ये डिझाईन इंजिनिअर म्हणून नोकरी केली. त्याचवेळी त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली. २०१७ मध्ये ते केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचे वडील हे रेल्वेत अधिकारी होते.

# सम्राट गणेश शिंदे याचे घवघवीत यश

पुणे येथे झालेल्या जी चॅम्प अबॅकस संचलित गणेश काळे क्रीडांगण मंच स्वारगेट पुणे या ठिकाणी १५ डिसेंबर २०२४ रविवार G-champ नॅशनल लेवल स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती या स्पर्धेत देशभरात सुमारे सुमारे ५००० विद्यार्थ्यांच्या सहभाग झालेला होता यामध्ये. निक कोचिंग क्लासेस स्वराज्य नगर बीड व जालना रोड लक्ष्मी नगर बीड येथील सम्राट गणेश शिंदे 4th level याने दुसरे बक्षीस मिळवले. विद्यार्थ्यांच्या यशाच्या मागे G - Champ Abacus क्लासेसच्या संचालिका सौ. जया तिरगुळ मॅडम यांचे म ोलाचे मार्गदर्शन ठरले. तसेच क्लासेसचे यश पाहून जया तिळगुळ मॅडम यांना नॅशनल लेवल बेस्ट टीचर व बेस्ट फेंचाइसी 1st क्रमांकाने (पुणे) गौरवण्यात आले. मुलांच्या व क्लासेच्या यशाच्या मागे शिक्षक स्टाफचाही मोलाचा वाटा आहे. यामध्ये सो. जयश्री जाधव मॅडम, कु. कुणीका फाटक मॅडम, सौ पल्लवी निकाळजे मॅडम, यांनीही मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. या स्पर्धेचे आयोजन पुणे येथे G - Champ Abacus चे डायरेक्टर श्री. योगेश देशमाने सर, व सौ. आरती देशमाने मॅडम, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.




# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले देशमुख परिवाराचे सांत्वन दोषी व्यक्तींना कठोर शासन होईल याची दिली ग्वाही

बीड दिनांक २० ( जिमाका ) :–मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन्यांना कठोर शिक्षा होईल या दृष्टिकोनातून शासन काम करीत आहे याप्रकरणी दोषी व्यक्तींना फाशी दिली जाईल यासाठी मी स्वतः या प्रकरणात पूर्ण लक्ष देणार आहे अशी ग्वाही देतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मस्साजोग येथे देशमुख यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन प्रसंगी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. दिवंगत देशमुख यांची पत्नी, मुलगी तसेच भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी घटनेबाबत चर्चा करून माहिती घेतली व शासन सर्व प्रकारे या प्रकरणात तपास करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देईल असे सांगितले. सदर घटना ही



माणुसकीला काळीमा फासणारी घटना

आहे असेही ते म्हणाले. शासनाच्या वतीने मी श्रद्धांजली अर्पण करतो असे श्री. पवार म्हणाले. त्यांनी दिवंगत देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली.पोलीस आपल्या पद्धतीने तपास करीत आहेत सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून यात कुठलीही त्रुटी राहणार नाही असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, या घटनेमागे कोणी मास्टरमाईड असेल तर त्यालाही सोडले जाणार नाही.यावेळी श्री पवार यांच्या समवेत ज्येष्ठ नेते रमेश आडसकर,डॉ. योगेश क्षीरसागर तसेच आदि उपस्थित होते.

# खा.सोनवणेंनी दाखविले काम; मस्साजोगसह २० विषयांवर उठविला संसदेत आवाज

## एकाच अधिवेशनात जिल्ह्याच्या अनेक विषयांना गती, विकासाचा नवा इतिहास लिहिण्यासाठी प्रयत्न

बीड । प्रतिनिधी दि.२५ नोव्हेंबर ते २० डिसेंबर या कालावधीत संसदेचे १८ वे (शीतकालीन) अधिवेशन नवी दिल्ली येथे संपन्न झाले. या अधिवेशनात खा.बजरंग सोनवणे यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्यांकाड प्रकरणात सर्वप्रथम आवाज उठविला. याच बरोबर जिल्ह्यातील २० महत्वपूर्ण मुद्द्यांना हात घालत रेल्वे, संपादित जमीनी, रोजगार, आरोग्य आदि विषय पोटतिडकीने मांडले. एकाच अधिवेशनात अनेक विषयांना गती देऊन विकासाचा नवा इतिहास लिहिण्याचा प्रयत्नच यातून दिसत आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी ग्रामपंचायतीपासून कामकाजाला सुरूवात केलेली आहे. यामुळे ग्राऊंडवरील प्रश्नांची जाण ठेवून संसदेच्या अधिवेशनात जवळपास वीस विषयांना हात घातला. दि.९ डिसेंबर रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर एक तासात मिडीयासमोर येऊन ही हत्या पवनचक्की खंडणी वसुली प्रकरणातून झाली आहे हे त्यांनी ठासून सांगितले. ११ डिसेंबर रोजी याच प्रकरणात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली तर १६ डिसेंबर रोजी संसदेत आणि संसदेबाहेरही खा. प्रियंका गांधी, खा. सुप्रिया सुळे व महाविकास आघाडीतील सर्व सहयोगी खासदारांसोबत आवाज उठविला. यामुळे महाराष्ट्र ढवळून निघाला. परिणामी, गुन्हे दाखल झाले आणि तपासाला गती मिळाली. याच बरोबर आहिल्यानगर- बीड- परळी रेल्वे १५ ऑगस्ट २५ पूर्वी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे. घाटनांदूर येथे रेल्वे थांबा, जिल्ह्यातील रेल्वेसाठी संपादित जमिनीचा मावेजा वाटप, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, रासायणिक औषधे व खतांचा अतिरेकी वापरामुळे शेती व मानवी प्रकृतीवर होत असलेले दुष्परिणाम, ऋपोल्ट्री व्यवसाय नियमात सुधारणा करणे, राष्ट्रीय खेळाडु युवतीना शासकीय सेवेत सामाऊन घेणे, तरुणांना रोजगारसंधी उपलब्ध करुन देण्यासाठी तातडीने कृती करणे, मराठा व कुणबी एकच आहेत. याबाबतचे सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन केंद्रीय मागासवर्गीय आयोगास निर्देश देणेसाठी पाठपुरावा, वक्फ बोर्ड नियम १९९५ मधे सुधारणा करण्याचे विधेयकावर पुनर्विचार करावा अशी मागणी गठित समितीसमोर केली, ऋसंसदीय समितीच्या समितीमधे प्रभावी काम करणे तसेच केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सल्लागार समितीमधे पोलीस तपासामधे आधुनिक साधनांचा वापराचे महत्व, जिजाऊ मल्टीस्टेटमधील ठेवीदारांना न्याय देणे, ऋपवनचक्की व सौरउर्जा प्रकल्पासाठी कंपन्यांकडून शेतकऱ्यांचे होत असलेले शोषण व दडपशाही थांबविणे, बीड येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व दवाखाना उभारणीस मंजुरी देणे, जिल्ह्यामधे नवीन उद्योग उभारणीसाठी कंपण्यांना प्रोत्साहित करणेसाठी सुविधा निर्माण करणे, सर्वच तालुका मुख्यालयास तालुकास्तरावर मिनी क्रीडा संकुल उभा करणे, राष्ट्रीय महामार्ग कामांना गती देणे, राक्षसभुवन फाटा ते शेवगाव व पिठ्ठी ते टाकळी काझी या जिल्ह्यातील रस्त्यांचा दर्जावाढ करुन राष्ट्रीय महामार्ग दर्जा देणे, सूरत-चेन्नई प्रस्तावित राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन कामास गती देणे, माजलगाव ते केज या महामार्गावरील धारुर घाटामधे प्रवाशांची होत असलेली असुविधा दूर करणे, अशा जवळपास २० विषयावर त्यांनी प्रभावीपणे विषय मांडले. यामुळे जिल्ह्यातील या विषयांना गती मिळताना दिसत आहे. एकूणच यापुर्वी संसदेत असे विषय मांडताना कोणीही दिसले नव्हते, यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाचा नवा इतिहासच लिहिण्यासाठी खासदार सोनवणे प्रयत्न करत असल्याचे दिसते



## सं पा द की य

# लाईफ जॅकेटचा अभाव; मृत्यूसोबत सागरी प्रवास

नौदलाच्या स्पीड बोटीने गेट वे ऑफ इंडिया ते एलिफंटादरम्यान प्रवाशांची ये–जा करणाऱ्या नीलकमल बोटीला धडक दिली. या झालेल्या अपघातात प्रवासी वाहतुकीच्या बोटीला तर जलसमाधी मिळालीच; परंतु या बोटीतील १० प्रवासी आणि तीन नौदल कर्मचारी अशा १३ जणांना मृत्यू झाला आहे. मुळातच या अपघातात प्रवासी बोटीचा काहीही दोष नव्हता, दोष होता तो नौदलाच्या स्पीड बोटीचे संचलन करणाऱ्या चालकाचाच. अपघात झाल्यानंतर नौदलाच्या काही घटकांकडून अपघाताचे खंडन करण्याचा प्रयत्न झाला, प्रवासी बोटीमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसल्याने अपघात झाल्याचा दावाही नौदलाकडून करण्यात आला. स्पीड बोटीच्या इंजिनात बिघाड झाल्याने हा अपघात झाल्याचे स्पष्ट झाले. प्रवासी संख्या जास्त असल्याचा दावाही नीलकमलच्या मालकाने फेटाळला. महाराष्ट्रात महायुतीचे लोकहितैषी सरकार सत्तेवर असल्याने या अपघाताची राज्य सरकारकडून तातडीने दखलही घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने हालचाली करत या प्रकरणी संबंधितांना मदत करण्याचा प्रयत्न केला, प्रशासकीय यंत्रणा तातडीने हलविली. जखमींना उपचाराची व्यवस्था करून दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृताच्या नातेवाइकांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदतही जाहीर केली. केंद्रानेही दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली. अपघात झाल्यानंतर तातडीने मदत मिळाली असती तर कदाचित मृतांपैकी अनेकांना वाचविणे शक्यही झाले असते. इरशाळवाडीच्या घटनेनंतर कोणतीही दुर्घटना असो एकनाथ शिंदे याकडे गंभीरपणे लक्ष देतात, याचा महाराष्ट्राने जवळून अनुभव घेतलेला आहे. दूरदूरपर्यंत नजर जाईल इतका अथांग सागर पसरलेला असताना स्पीड बोट प्रवासी बोटीला कशी धडकली? हा अपघात कसा घडला? असे प्रश्न अनेकांच्या मनात आहेत. एका प्रत्यक्षदर्शीने या अपघाताचा शूट केलेला व्हीडिओ समोर आला आहे. त्यावरून हा अपघात किती भीषण होता याची कल्पना येते. एलिफंटाला चाललेल्या नीलकमल या प्रवासी बोटीला स्पीड बोट धडकली. ही स्पीड बोट नौदलाची होती. नौदलाकडून हा अपघात कशामुळे झाला? त्याबद्दल स्पष्टीकरण देण्यात आले. नौदलाने सांगितले की, मुंबई बंदरात स्पीड बोटीच्या इंजिनाची चाचणी सुरू होती. त्यावेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने स्पीड बोटीचं नियंत्रण सुटले व स्पीड बोट नीलकमल बोटीला येऊन धडकली. मात्र समोर आलेल्या व्हीडियोमध्ये स्पीड बोट नीलकमल बोटीपासून काही अंतरावर समुद्रात राऊंड मारताना दिसते. स्पीड बोट टर्न झाल्यानंतर पूर्णपणे ती अनियंत्रित झाली व नीलकमल बोटीला धडकली. या अपघातामुळे मुंबई, ठाणे, रायगड भागांत हळहळ व्यक्त केली जात असतानाच नाशिक जिल्ह्यावरही या अपघाताचे पडसाद उमटले. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगावच्या आहेर दाम्पत्यांसह चिमुकल्याचा मुत्यू झाला. म्हणजे संपूर्ण कुटुंबच उद्ध्वस्त झाले. आजारावर उपचारासाठी पिंपळगावच्या राकेश नाना आहेर हे दोन दिवसांपूर्वी पत्नी व मुलासह मुंबई येथे गेले होते; परंतु बोट दुर्घटनेत आहेर कुटुंबीयांचा बळी गेला. अपघाताची चौकशी करताना नौदलाकडूनच स्पष्ट करण्यात आले की, नीलकमल बोटीला धडक देणाऱ्या नौदलाच्या स्पीड बोटीचे इंजिन नुकतेच बदलण्यात आले होते. त्यामुळे या बोटीची चाचणी सुरू होती. अशा चाचणीदरम्यान बोट आठ आकड्याच्या आकारात समुद्रातून फिरवली जाते. मात्र, दुर्दैवाने याचवेळी इंजिनमध्ये बिघाड झाला आणि चालकाचा बोटीवरील ताबा सुटून ही स्पीडबोट नीलकमल बोटीवर आदळली. या बोटीवर नौदलाचे २ जवान आणि या बोटीला इंजिन पुरवणाऱ्या कंपनीचे ४ कर्मचारी उपस्थित होते. प्रचंड वेगात ही स्पीडबोट आदळल्याने स्पीडबोटीवरील तिघांचा मृत्यू झाला. या स्पीडबोटीच्या प्रचंड वेगामुळे नीलकमल बोटीला मोठी भेग पडली. जणू तिचे दोन तुकडे झाल्याप्रमाणे तिची स्थिती झाली. स्पीडबोटचाही चक्काचूर झाला. एव्हाना नीलकमल बोटीमध्ये पाणी शिरू लागले. त्यामुळे प्रवासी प्रचंड घाबरले. त्यांची तारांबळ उडून पळापळ सुरू झाली. या घटनेची माहिती कळताच शेजारील अन्य बोटी, नौदल आणि कोस्टगार्डच्या बोटींसह नौदल हेलिकॉप्टरने तत्काळ बचावकार्य सुरू केल्याने ९९ जणांना वाचवण्यात यश मिळाले. नीलकमल बोटीवरील ५ खलाशी सुरक्षित आहेत. नीलकमल बोटीत वेळेत लाईफ जॅकेट दिले नसल्याचा आरोप बोटीतून बचावलेल्या एका प्रवाशाने केला. अपघात झाल्यानंतर पाणी बोटीत शिरल्यानंतर लाईफ जॅकेट दिल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान बोटीत पुरेशी लाईफ जॅकेट उपलब्ध नव्हती, अशी माहितीही काही प्रवाशांकडून प्राप्त झाली.लाईफ जॅकेट प्रवासी बोटीवर असती तर कदाचित मृतांना वाचविणे शक्य झाले असते. नौका चालकासह इतरांवर हा गुन्हा दाखल केला आहे. बचावलेले नथाराम चौधरी यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. आता चौकशी करण्यात येईल. दोषींना शासन होईल. पण अपघातात ज्यांचा मृत्यू झाला आहे त्यांच्या घरावर शोककळा पसरली आहे. त्यांचे काय? पाच लाखांच्या मदतीने ही पोकळी भरून निघणार आहे का? नौदलाच्या बोटींना सराव करताना खबरदारी घेणे आवश्यक होते. तसेच प्रवासी सुविधा देणाऱ्या बोटीच्या मालकानेही माफक प्रमाणावर लाईफ जॅकेट ठेवणे आवश्यक होते. तसेच समुद्रात अपघात घडल्यावर तत्काळ मदत मिळणे आवश्यक आहे. रस्त्यावरील अपघात आणि सागरातील अपघात यात कमालीचा फरक आहे. रस्त्यावरील अपघातात रुग्णवाहिका तसेच अन्य मार्गाने मदत देता येते. पण सागरातील अपघात थेट खोल पाण्यातच होत असल्याने काही मिनिटांतच होत्याचे नव्हते होते. नीलकमलच्या अपघातातही तेच घडले. लाईफ जॅकेटचा तुटवडाप्रकरणी नीलकमलचा मालक, नौदलाच्या स्पीड बोटीवरील चालक तितकेच जबाबदार असून मदतीस झालेला विलंब याचीही यानिमित्ताने चौकशी होणे आवश्यक आहे. घटनेतून बोध घेत प्रशासनाने सागरात योग्य ती उपाययोजना तातडीने करावी. अन्यथा गेट वे ऑफ इंडिया ते एलिफंटा तसेच उरण या भागात ये–जा करणाऱ्या प्रवासी बोटीतून प्रवास करणे म्हणजे मृत्यूसोबत घेऊन सागरी प्रवास करण्यासारखे होईल.

# इथे ओशाळली लोकशाही

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गुरुवारी भाजपा आणि काँग्रेसच्या खासदारांमध्ये जो राडा झाला, तो निश्चितच लोकशाही व्यवस्थेला काळिमा फासणारा आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५२ पासून देशामध्ये संसदीय व्यवस्था आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेप्रमाणे लोकशाहीचा कारभार चालतो. अर्थांत त्या त्या सत्ताधारी सरकारने आपल्याकडे असलेल्या बहुमताच्या जोरावर घटनेमध्ये बदल करत आपल्याला अनुकूल असलेला राज्यकारभार करण्याला प्राधान्य दिले. गुरुवारी संसद भवनात झालेला राडा थेट रुग्णालयापर्यंत जाऊन पोहोचला. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत देशाचे केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी लोकसभेमध्ये काढलेल्या वक्तव्यावरून विरोधकांनी गदारोळ सुरू केला. मुळातच अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत काढलेल्या वक्तव्याची चिरफाड करत, त्या वक्तव्याचा विपर्यास केला असल्याचे यांचे म्हणणे आहे. देशाच्या संसदेमध्ये सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये वाद नेहमीच होतात. पण ते वाद लोकशाहीच्या चौकटीमध्ये घटनात्मक पद्धतीने नियमातच मिटविले जातात. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. त्या धर्तीवर लोकसभा व राज्यसभा कामकाजादरम्यान खासदारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी लोकसभा अध्यक्ष तसेच राज्यसभेचे सभापती उपलब्ध करून देतात. सत्ताधाऱ्यांनी मत मांडण्याची संधी न दिल्यास सभात्याग करणे, जमिनीवर ठिय्या मांडणे, निदर्शने करणे, घोषणाबाजी करणे या स्वरूपात अनेक आयुधे लोकशाहीत उपलब्ध आहेत. त्यासाठी अंगावर धावून जाणे, धक्काबुक्की करणे, हाणामारी करणे हे पर्याय निश्चितच योग्य नाहीत आणि लोकशाहीमध्ये हे कोणालाही अभिप्रेतही नाही. त्यामुळे घडल्या प्रकाराचे कोणीही समर्थन करूच शकत नाही. मुळात संसद भवनात गुरुवारी घडलेला प्रकार चुकीचा होता. भाजपा व मित्रपक्षाला लोकसभेत स्पष्ट बहुमत आहे. काँग्रेसला जेमतेम सांगलीच्या अपक्ष खासदाराचे पाठबळ मिळाल्याने संख्याबळामध्ये शंभरी गाठता आली आहे. संसद भवनामध्ये काँग्रेस व भाजपाच्या खासदारांमध्ये जो राडा झाला, हाणामारी झाली. खासदारांवर रक्तबंबाळ होण्याची व त्यानंतर उपचारासाठी रुग्णालयात दाखल होण्याची वेळ आली. या घटनेमुळे देशाच्या लोकशाहीची मान निश्चितच शरमेने खाली गेली असणार. जगातील सर्वाधिक मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून आपल्या देशाचा उदोउदो होतो. पण खासदारांच्या हाणामारीच्या घटनेने ही लोकशाही आहे की ठोकशाही आहे, असा प्रश्न आता जगातील अन्य राष्ट्रांनाही पडला असेल. अमित शहा यांच्या वक्तव्यावरून काँग्रेस व इंडिया आघाडीतील मित्र खासदारांनी संसदेच्या आवारात निदर्शने करताना भाजपा खासदारांनी त्या ठिकाणी जाण्याची गरजच नव्हती. महापुरुषांबाबत अवमान अथवा अवमानास्पद वक्तव्य काढल्यास समाजमनामध्ये तेढ निर्माण होते. त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. प्रसंगी रस्त्यावर जाळपोळ होते. सार्वजनिक वाहनांची तोडफोड होते. शहरांमध्ये बंदचे आयोजन केले जाते. जमाव रस्त्यावर उतरतो. असे प्रकार आपल्या देशाच्या कानाकोपऱ्यांत अनेकदा घडले आहेत व घडत आहेत तसेच यापुढेही घडतच राहतील. डॉ. आंबेडकरांबाबत काँग्रेसच्या दाव्यानुसार चुकीचे वक्तव्य केले असेल तर त्यांनी निदर्शनापुरता केलेला प्रकार मर्यादित राहिला असता, तर पुढे विपरीत काही घडलेच नसते; परंतु त्याहीपुढे त्यांनी फार तर लोकसभा सभापतींकडे तक्रार करावयास हवी होती अथवा न्यायालयाचे दरवाजे ठोठावयाचे होते. भाजपाच्या गोंधळी व अतिउत्साही खासदारांनीही या प्रकरणी तारतम्य दाखवत संयम व सहनशीलता बाळगणे आवश्यक होते. लोकसभेतील संख्याबळ पाहता काँग्रेस काय आणि इंडिया आघाडी काय, सत्ताधाऱ्यांना सभागृहात फारसे अडथळे त्यांना आणता येणार नाहीत. विरोधक निदर्शने करत असताना राहुल गांधी व प्रियंका गांधींची अडवणूक करायची सत्ताधारी खासदारांना गरजच नव्हती. मुळातच हा विषय सुरू झाला तो अमित शहा यांनी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी काढलेल्या वक्तव्यावरून. वक्तव्य चुकीचे असल्याचा एकीकडे विरोधकांकडून टाहो फोडला जात असतानाच दुसरीकडे अमित शहा यांच्या म्हणण्याचा विपर्यास केला जात असल्याचे सत्ताधाऱ्यांचे म्हणणे आहे. मुळात सत्ताधारी आणि विरोधकांतील गोंधळी खासदारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय, कार्य, विचारधारा चांगली ठाऊक असती, तर संघर्ष टोकाला गेला नसता. ज्या घटनाकारांचे नाव घेऊन हा गोंधळ सुरू आहे, त्या घटनाकारांना अभिप्रेत असलेले कामकाज संसदेत खरोखरच होत आहे का? मुळात संसदेमध्ये होत असलेले अधिवेशन हे राजकारणासाठी तर देशातील जनतेसाठी महत्त्वाचे आहे. संसदेमध्ये होणाऱ्या कामकाजातील प्रत्येक मिनिटावर देशाचे लक्षावधी रुपये खर्च होतात. गदारोळ, वाद यामुळे सभागृह स्थगित ठेवण्याची अनेकदा वेळ या अधिवेशनात आली आहे. यामुळे देशाच्या लाखोकरोडो रुपयांचे न भरून येणारे नुकसान होत आहे. त्या त्या लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी देशाचा कारभार चालविण्यासाठी, मतदारसंघाचा विकास करण्यासाठी खासदारांना निवडून पाठविले आहे. गोंधळ घालण्यासाठी नाही, हे मतदारांनीच आता खासदारांना समजावून सांगण्याची वेळ आली आहे. दिल्लीचे पडसाद मुंबईतही उमटले. भाजयुमोच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मुंबई महापालिका मुख्यालयासमोरील व पत्रकार संघाच्या शेजारी असलेल्या काँग्रेसच्या कार्यालयावर हल्लाबोल केला. पोलिसांनी समजावूनही भाजयुमोचे पदाधिकारी माघार घेत नव्हते. अखेरीस पोलिसांनी लाठीचार्ज केल्यावर भाजयुमोच्या पदाधिकाऱ्यांनी तेथून काढता पाय घेतला. काँग्रेस भवनाचे नुकसान झाले. काँग्रेस नेत्यांच्या प्रतिमेवर शाईफेक करण्यात आली. पण यातून भाजयुमोने साध्य काय झाले? काँग्रेस घटनाकारांचा अपमान करत असेल तर त्यांनी न्यायालयात जाण्याचा अथवा पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करावयास हवी होती? देशात व राज्यात भाजपाची सत्ता असताना कायदासुव्यवस्था हाती घेण्याचा त्यांना कोणी अधिकार दिला आहे? घटनाकारांना अभिप्रेत असलेल्या लोकशाहीनुसार संसदेत घटनात्मक पद्धतीने कारभार करणे म्हणजेच घटनाकारांचा मान राखल्यासारखे, सन्मान केल्यासारखे आहे. पण ठोकशाहीच्या दिशेने वाटचाल करताना खासदारांनी रक्तबंबाळ होणे हे देशामध्ये कोणालाही अभिप्रेत नाही. घडलेली घटना निश्चितच चांगली नाही. यामुळे देशाची जागतिक पातळीवर प्रतिमा मलीन होत आहे, याचे सत्ताधारी व विरोधक असलेल्या खासदारांनीही भान ठेवणे आवश्यक आहे

# बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला, भ्रष्टाचाराला आणि बेरोजगारीला राजकारणी लोक जबाबदार आहेत-ज्ञानेश्वर कवठेकर

बीड । प्रतिनिधी बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यापासून ज्या काही घटना घडत आहेत त्या घटना पूर्वी युपी बिहार या राज्यांमध्ये राजकारणासाठी घडत होत्या त्याच पद्धतीच्या घटना आज घडीला पुरोगामी असलेल्या बीड जिल्ह्यामध्ये राजकीय नेते मंडळी घडवून आणत आहेत बीड जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांकडून जिल्ह्यात गुंडाराज सुरू आहे बीड जिल्ह्यात घडणाऱ्या प्रत्येक राजकीय अराजकीय घटनेला हे नेतेमंडळी जातीय रंग दे-ऊन बीड जिल्ह्यातील सामाजिक विन बिघडवण्याचं काम करत आहेत राजकीय नेते मंडळीचा प्रमुख उद्देश हा असला पाहिजे की आपापल्या मतदारसंघातील लोकांची सेवा करणे, मतदारसंघामध्ये कल्याणकारी योजना राबवणे, आपल्या जिल्ह्याला व राज्याला प्रगतीच्या दिश-ने घेऊन जाणे हाच उद्देश सर्व पक्षा-तील राजकीय नेते मंडळीकडे असायला हवा. बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आज घडीला वेगळे पायंडे पडताना दिसत आहेत ज्यावेळी राजकारणा-तील मूल्ये संपतात त्यावेळेस राजकीय नेते मंडळी गुंडगिरी करणाऱ्या लोकांचा वापर करतात बीड जिल्ह्यातील एकही मोठा नेता आमदार खासदार मंत्री जिल्ह्याच्या विकासाकडे लक्ष देत नाही किंवा विकासात्मक दृष्टीने चर्चा करत नाही यामुळे जिल्ह्यात सुशिक्षित बेर-ोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे हाताला काम नसल्यामुळे जिल्ह्यातील तरुण पिढी ही गुन्हेगारी क्षेत्राकडे वळत आहे जिल्ह्यात एकही मोठा प्रकल्प नाही जिल्ह्यातील तरुणांच्या हाताला काम नसल्यामुळे हे तरुण गुन्हेगारी क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत आज जिल्ह्यात छो-ट्या छोट्या कारणांमुळे खून मारामाऱ्या अपहरणासारखे गंभीर गुन्हे घडवून आणले जात आहेत बीड जिल्ह्यातील जनता भयभीत वातावरणात जीवन जगत आहे जिल्ह्यात कधी काय होईल याचा नेम नाही जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय वातावरण गढूळ झाले आहे जे येणाऱ्या पुढील पिढी साठी धोकाद-ायक आहे जाती धर्माचा नावावर सग्या सोयऱ्यांचे मुडदे पाडले जात आहेत बीड जिल्ह्याच्या राजकारणातून संवेदनशी-लता व सुसंस्कृतपणा कमी झाला आहे वैयक्तिक झालेल्या वादालाही जातीचे रंग दिले जात आहेत पुरोगामी अस-लेल्या आपल्या जिल्ह्याला राजकीय नेते मंडळी जाणीवपूर्वक जाती धर्माच्या नावावर धगधगीत करून ठेवत आहेत यामुळेच बीड जिल्ह्यात गुन्हेगारी भ्रष्टा-चार व बेरोजगारीपणा वाढला आहे याला जबाबदार सर्वच पक्षातील राजकीय नेते मंडळी आहेत.

# पालकांचे डोके ठिकाणावर आहेत का आणि क्लासेस वाल्यांनो शिक्षणाचा बाजार करून धंदा बंद करा



रुपाली देशपांडे
मो.८८८८९५५५३९

पालक, पाल्य आणि शिक्षण हा एक मोठा विषय आहे आज आपण या पाहिल्या भागाचे पाहुयात. सध्या शालेय किंवा कॉलेज मधील शिक्षण जेवढे महत्वाचे आहे. तेवढेच कदाचित याही पेक्षा महत्वाचे आवानंतर क्लासेस चे महत्व वाढले आहे. हे महत्व कोणी वाढवले तर क्लासेस आणि पालक शाळा,कॉलेज यांनी या क्लासेस ला वरती उचलून धरले. या क्लासेस ने तर लाजा सोडल्यात. यांना तर हे क्लासेस म्हणजे सोण्याची खान सापडल्या सारखंच झालं आणि यांना मोठे करणारे पालक तर काय जसे क्लासेस ने लाजा सोडल्या तसे पालकांनी हि लाजा सोडल्यात कारण त्यांना असे झाले कि क्लास लावला तरच आपण समाजात ठीकवून राहतोल. बडेपणा साठी यांनी लाजा सोडल्यात. या बडे जावी पनात यांची किती नुकसान होते आणि काहीही कारण नसताना क्लासेस वाल्याना श्रीमंत करण्याचे काम हे पालक करत आहे.शाळा कॉलेज मध्ये शिकवले जाणारे सर्व विषय परत या क्लास वाले शिकवतात. मुलांना जर तिथले समजत नसेल तर शाळा कॉलेज वाले काय हिबू भाषेत शिकवतात का? का क्लासेस वाल्यांना मोठे करण्यात यांचा हि हात आहे? शाळेत शिकवणारे सगळे विषय परत हे क्लास वाले शिकवतात मग मुलाना हे शाळेत समजत नसेल आणि पालकांना परत या सर्व विषयांचा क्लास लावण्या ची गरज भासत असेल तर मग शाळा कॉलेज बंद करावेत आणि शाळा कॉलेज चे सर्व अधिकार या क्लासेस वाल्यांना द्यावेत यात पालकांचा पैसा आणि मुलांचा वेळ वाचेल आणि मुलं हि जरा मोकळ्या वेळेत जरा श्वास घेतील. मुलांना तर दावणीला बांधल्या सारखंच आहे.मुलं तरी एकच विषय दोन वेळेस शिकत असतील तर त्याना किती त्रास होत असेल. हे हि पाहायला हवं. आता तर अगदी ज्या विषयांची डबल शिकण्याची गरज नसेल त्याही विषयाचा क्लास आहे. आपली पोरं इतकी मतिमंद झालीत का कि सगळ्याच विषयांना क्लास लावावा लागेल याचा ही विचार करायला हवा. किती पैसा या पालकांचा जातो. शाळेतील खर्च वेगळा आणि क्लास मधील वेगळा जे पालकांची जेम तेम परिस्थिती आहे त्यांनी काय सामूहिक पद्धतीने आत्महत्या करावी का?साधारण परिस्थिती आहे आणि रोजच्याच रोजी रोटीचा प्रश्न अश्या मुलांना या क्लासवाले कमी पैशात शिकवतात का हे पाहिले पाहिजे. आता तर पायलीचे पन्नास क्लास आहेत. प्रत्येक गल्लीत हे क्लासेस आहे.या सर्वांचा पालकांनी विचार करावा. तुम्ही मुलांना फक्त शिक्षण देणारे पालक नाहीत तर मुलांचे लाडके आई वडील आहात, त्यांच्या सर्वांगीन विकास करायला हवा शालेय शिक्षणा व्यतिरिक्त हि मूल्य शिक्षण आवश्यक आहे. मुलांना यातूनच वेळ मिळत नाही तर बाकी शिक्षण कधी करावे. शालेय शिक्षण सोडून मुलांनी आयुष्य कसे असावे, जीवनाचा धडा हि शिकणे आवश्यक आहे. हे पालक कधी विचार करतील कुणास ठाऊक. खरंतर पालकांना हि वेळ मिळत नाही कारण मुलाना या क्लास मधून त्या क्लास मध्ये आणि यातून त्या क्लास मध्ये सोडवतच वेळ मिळत नसेल तर पालकांनो जरा थांबा, थोडा श्वास घ्या आणि स्वतःलाच विचारा कि खरंच या सर्वांची गरज आहे का? या क्लासेस मधील प्रत्येक विषयाची शिकवणी ची खरंच गरज आहे का? नसेल गरज तर मग हे सर्व तुम्ही स्वतः बंद करा आवश्यक असलेले त्याचीच शिकवणी लावा तुमची आर्थिक आणि वेळेची बचत करा. मूकबधिर असल्या सारखे करू नका आवाज करा बोला धडाधड आणि मुलांचा हि आतला आवाज ऐकायचा प्रयत्न करा. मुलं तुमच्या आणि क्लासेस च्या दावणीला बांधलेले जनावर नाहीत हे लक्षात घ्या. पालकांनो तुम्ही हुशार होतात म्हूणन तुम्हला तुमच्या काळत फक्त दोनच विषयला शिकणी होती इंग्लिश आणि विज्ञान. आताची पिढी तर तुमच्या पेक्षा खूप हुशार आहे मग खरंच या शिकवणी चा खटाटोप आवश्यक आहे का? सर्व प्रश्नाचा बारकाईने विचार करा आणि तुमच्या पाल्याला जरा श्वास घेऊद्या. क्लास वाल्यांनो जरा तर काही शरम ठेवा जनाची नसली तरी मनाची किती पैसे घ्याचे ते शिवणीचे.तुम्ही आज क्लास सुरु केला कि पुढच्या वर्षात तुमचे दोन तीन मजली घरे होतात ते फक्त याचं पैशातून आहे तर तुम्हला थोडी तरी बाळगावी लागेल. शिक्षण हे ज्ञाणांचे मंदिर आहे जास्तचे पैसे घेऊन आणि दर वर्षला वारेमाप फिस वाढवण्याचा धंदा नाही हे लक्षात घ्यावे. हा जो तुम्ही लोकांनी शिक्षणाचा धंदा केला आहे ना तो तात्काळ थांबवा. पालक आणि मुले जागरूक झाले तर तुम्ही हा जो धंदा करणार आहात ना त्याचे शटर लवकरच बंद होतील हे लक्षात घ्या

बाकी सदर पुढील अंकात

संपर्क – ८८८८९५५५३९

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २२ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले देशमुख परिवाराचे सांत्वन

## दोषी व्यक्तींना कठोर शासन होईल याची दिली ग्वाही



बीड दिनांक २१ ( जिमाका ) :-मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन्यांना कठोर शिक्षा होईल या दृष्किोनातून शासन काम करीत आहे याप्रकरणी दोषी व्यक्तींना फाशी दिली जाईल यासाठी मी स्वतः या प्रकरणात पूर्ण लक्ष देणार आहे अशी ग्वाही देतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मस्साजोग येथे देशमुख यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन प्रसंगी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. दिवंगत देशमुख यांची पत्नी, मुलगी तसेच भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी घटनेबाबत चर्चा करून माहिती घेतली व शासन सर्व प्रकारे या प्रकरणात तपास करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देईल असे सांगितले. सदर घटना ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे असेही ते म्हणाले.

शासनाच्या वतीने मी श्रद्धांजली अर्पण करतो असे श्री. पवार म्हणाले. त्यांनी दिवंगत देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली.

पोलीस आपल्या पद्धतीने तपास करीत आहेत सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून यात कुठलीही त्रुटी राहणार नाही असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, या घटनेमागे कोणी मास्टरमाईड असेल तर त्यालाही सोडले जाणार नाही.

यावेळी श्री पवार यांच्या समवेत ज्येष्ठ नेते रमेश आडसकर,डॉ. योगेश क्षीरसागर तसेच आदि उपस्थित होते.

### महाराष्ट्र विधिमंडळाचे सन २०२४ चे हिवाळी अधिवेशन दोन्ही सभागृहात मंजूर विधेयके :१७ संयुक्त समितीकडे प्रलंबित विधेयके:

०१ विधान सभेत प्रलंबित विधेयके : ०१ एकूण : १९ दोन्ही सभागृहात मंजूर विधेयके (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०२४ (ग्रामविकास विभाग) (२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ (नगर विकास विभाग) (अप्रत्यक्षपणे निवडलेल्या नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा पदावधी पाच वर्षे करणे) (३) श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४ (विधि व न्याय विभाग) (विश्वस्त समितीचा कार्यकाळ आणि समिती सदस्यांची संख्या वाढविणे) (४) महाराष्ट्र शासकीय कर्मचा=यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा=या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२४ (सामान्य प्रशासन विभाग) (सर्वसाधारण बदलीसाठीच्या कालावधी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढवण्याची तरतूद) (५) महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग) (जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजनाचे नियमाधीकरण करण्यास परवानगी देणे आणि नियमाधीकरण अधिमुल्य कमी करुन बाजारमुल्याच्या ५ टक्के इतके निश्चित करणे) (६) महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग) (७) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (वाचन संस्कृतीचा व ग्रंथालय चळवळीचा विकास करण्यासाठी अधिनियमाच्या विवक्षीत कलमांमध्ये सुधारणा करणेबाबत) (८) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (समुह विद्यापीठ घटित करणेच्या तरतुदीमध्ये सुधारणा) (९) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठं (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (तीन नवीन खाजगी विद्यापीठे स्थापन करणेबाबत) (१०) महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२४ (पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग) (अपराधांच्या शिक्षेत वाढ अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल कडक शिक्षा व दंड वाढविण्याबाबत) (११) हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रददब करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ ( महसूल व वन विभाग) (अनधिकृत हस्तांतरण नियमित करणेबाबत) (१२) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२४ (वित्त विभाग) (१३) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग) (१४) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक, २०२४ (वित्त विभाग) (१५) महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ (वित्त विभाग) (१६) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (१७) महाराष्ट्र कारागृहे व सुधारसेवा विधेयक, २०२४ (गृह विभाग) संयुक्त समितीकडे प्रलंबित (१) महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ (गृह विभाग) विधानसभेत प्रलंबित विधेयके (१) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४. (महसूल व वन विभाग) (दंडाच्या कमाल मर्यादेत वाढ) ०००

# संतोष देशमुख खुन प्रकरणातील मास्टरमाईंडला अटक करा

### संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांची मागणी; देशमुख कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट

बीड (प्रतिनिधी) केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी अत्यंत निर्दयीपणे हत्या करण्यात आली. या खुन प्रकरणातील काही आरोपी अजुनी मोकाट आहे. फरार आरोपींसह यातील मास्टरमाईडलाही अटक करुन फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी केली आहे.सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर याचे राज्यभर पडसाद उमटले. हिवाळी अधिवेशन देशमुख खुन प्रकरणाने गाजले. दरम्यान संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी मस्साजोग येथे देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी ॲड. आखरे म्हणाले की, संतोष देशमुख हे तीन टर्म सरपंच राहले राहिले आहेत. त्यांनी लोकोपयोगी केलेल्या कामांमुळे त्यांना नागरिकांनी तीनदा निवडून दिले. गोरगरीबांना मदत करणारे दादा म्हणून त्यांचा केज तालुक्यात नावलौकीक होता. मात्र काही दिवसांपूर्वी त्यांची हत्या करण्यात आली. घटनेनंतर गावच्या नागरिकांनी नऊ तास रास्तारोको केला. या घटनेला आज नऊ दिवसांचा कालावधी लोटला असून आजुनही अख्खे गाव या दु:खातून सावरले नाही. दरम्यान देशमुख खून प्रकरणातील उर्वरित फरार आरोपीसह यातील मास्टरमाईडलाही अटक करुन फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी ॲड.आखरे यांनी केली आहे. देशमुख कुटुंबियांना न्याय मिळेपर्यंत संभाजी ब्रिगेड शांत बसणार नाही असेही ॲड.आखरे म्हणाले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, विभागीय अध्यक्ष राहुल वायकर, अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष राजेश परकाळे, बीड जिल्हा अध्यक्ष शशिकांत कन्हेरे, बीड जिल्हा अध्यक्ष विजय दराडे, बीड जिल्हा अध्यक्ष प्रविण ठोंबरे व पदाधिकारी उपस्थित होते.



# विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार

गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार विदर्भात आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन, जलपर्यटन
मराठवाड्यातील वॉटरग्रीड प्रकल्प मार्गी लावणार पिक विमा कंपन्यांच्या गैर प्रकारांची सखोल चौकशी

नागपूर, दि. २१:- विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील मागास भागासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधत महाराष्ट्रातील जनतेला न्याय देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगीक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार असून मराठवाड्यातील वॉटरग्रीट प्रकल्प मार्गी लावणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गडचिरोली स्टील सिटी म्हणून उदयास येत असून येत्या तीन वर्षात गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर पीक विमा कंपन्यांच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सभागृहात स्पष्ट केले.

अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस विधानसभेत बोलत होते.

**विदर्भातील सिंचन**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प येत्या सात वर्षात मार्गी लावणार आहे. ८८ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे १० लाख एकर जमिन ओलिताखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे ५५० किलो मिटर लांबीची नवी नदीच तयार होणार असून यामुळे विदर्भात मुबलब पाणी उपलब्ध होणार आहे. नाग नदी सुधाराला मान्यता मिळाली आहे. नाग-पोहरा-पिवळी नदी असा प्रकल्प असून सांडपाणी या नद्यांमध्ये जाऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यामुळे औद्योगिक क्षेत्रात देखील वाढ होण्यास मदत होईल. मुबलक पाण्यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळेल. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी बळीराजा योजनेमुळे सिंचन क्षेत्र वाढणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. कन्हान नदी वळण योजनेला मंजूरी दिली असून ३२०० एकर जमिन सिंचनाखाली येणार आहे.

**विदर्भात आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन, जलपर्यटन**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारने मोठी गुंतवणूक केल्याने गोसी खुर्द प्रकल्पाच्या माध्यमातून जलपर्यटनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. अभोरा येथे जलपर्यटन तर भंडारा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया या ठिकाणी वनपर्यटन सुरू करण्यात येणार आहे. यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे पर्यटन स्थळ निर्माण करण्यात येणार आहे.

**विदर्भातील औद्योगिक विकास**

गडचिरोली-चंद्रपूर-वर्धा-भंडारा-नागपूर या प्राधान्य क्रमाने खनिकर्म (मायनिंग) प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये गडचिरोली ५० हजार कोटींची औद्योगिक गुंतवणूक झाली असून खनिजावर आधारित प्रकल्पामुळे गडचिरोली स्टील प्रकल्प म्हणून उदयाला येत आहे. चंद्रपूर येथे कोल गॅसिफिकेशन प्लँट करण्याचा निर्णय झाला आहे. या प्रकल्पाचा सामंजस्य करार होऊन केंद्राची मान्यता देखील मिळाली आहे. रामटेक, भंडारा येथील फेरो अलाय क्लस्टर डेव्हलपमेंटमुळे रोजगार निर्मिती होणार आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या सहाय्याने नागपूर मेट्रो प्रकल्प-२ पूर्ण करण्यात येणार आहे. कापूस ते कापड आणि कापड ते फॅशन संकल्पना अमरावतीच्या टेक्सटाईल पार्कमध्ये पूर्ण केली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**शेतक-यांना मदत**

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना जवळपास १६ हजार २१९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. तर धान उत्पादक शेतक-यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. वर्धा अमरावती अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यातील ५५ हजार शेतक-यांच्या संत्रा पिकांची गळती झाली होती. या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी तीन हेक्टर क्षेत्र मर्यादित प्रमाणे जवळपास १६५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



सोयाबीन व कापूस उत्पादकाला योग्य मदत दिली जात असून राज्यात ५५७ हमी भाव खरेदी केंद्रावर आतापर्यंत जवळपास २३ लाख ६८ हजार ४७५ क्विंटल इतकी सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. मागील पंधरा वर्षाच्या तुलनेत ही मोठी खरेदी आहे. ही खरेदी केंद्रे १२ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहेत. मध्यप्रदेशच्या धरतीवर खेरेदी व्यवस्था सुरू करण्यासंदर्भात संबंधित अधि-यांना सूचना दिल्या आहेत असे मुख्यमंत्री म्हणाले.

**मराठवाडा औद्योगिक विकासाचे दालन**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उद्योजकांचा कल राज्याकडे वाढला असून पुण्यानंतर संभाजीनगर व जालना ही दोन मोठी औद्योगिक क्षेत्र म्हणून पुढे येत असल्याने मराठवाडा औद्योगिक विकासाचे मोठे दालन होत आहे. वंदे भारत ट्रेन लातूरच्या कोच फॅक्टरीत तयार होत असल्याने या ठिकाणी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. टोयोटा प्रकल्प ऑरिक सिटीमध्ये आल्याने रोजगारच्या मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या ठिकाणी ऑटोमोबाईल ईको सिस्टीम व्हावी म्हणून कुशल मनुष्य बळ निर्माण होण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारले आहे. शिरूर ते छ. संभाजी नगर हा १४ हजार ८८६ कोटींचा ग्रीन फिल्ड मार्ग तयार करण्यात येत आहे. मराठवाडा,विदर्भातील शेतक-यांना दुग्धव्यवसाय करता यावा यासाठी मदत डेअरीची मदत घेऊन दुग्धव्यवसायाला चालना देण्यात येणार आहे.

**अलमट्टी धरणाची उंची**

सध्या अलमट्टी धरणाच्या उंचीचा प्रश्न चर्चेत असून कोल्हापूर, सांगली येथील शेतकरी, सामान्य नागरिक यांची जिवित हानी, मालमत्ता नुकसान होणार नाही यासाठी राज्य सरकार योग्य ती खबरदारी घेईल, असे ते म्हणाले.

**पीक विमा गैरप्रकारांची सखोल चौकशी**

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतक-यांच्या पिकाचे नुकसान होते यातून सावरण्यासाठी शासनाने पीक विमा योजना सुरू केली. शेतक-यांसाठी ही चांगली योजना आहे. या योजनेबाबत सदस्यांनी काही गंभीर मुद्दे सभागृहात उपस्थित केले आहेत. त्यामुळे बीडसह राज्यातील अन्य जिल्ह्यात या योजनेबाबत काही गैरप्रकार घडल्या संदर्भात सखोल चौकशी केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**मुंबई गोवा महामार्ग**

मुंबई गोवा या महामार्गाच्या कामातील अडचणी दूर करण्यात करण्यात आल्या आहेत. युध्दपातळीवर या प्रकल्पाचे काम सुरू असून हा महामार्ग पूर्ण होईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

ठाणे महापालिका विकास आराखडा संदर्भात सूचना व हरकती मागवण्यात आल्या आहेत. या सूचना हरकतींवर सुनावणी घेऊन योग्य निर्णय घेण्याचे निर्देश अधिका-यांना दिले आहेत. त्याचबरोबर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविणार आहे असे स्पष्ट करत मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या अडिच वर्षात हाती घेतलेली कामे प्राधान्याने पूर्णत्वाला नेण्यात येणार आहेत.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील ट्रेनी शिक्षिकेची निवड नियमबाह्य ; योग्य उमेदवार निवडीसाठी धरणे आंदोलन

बीड:- ( दि.२१) बीड तालुक्यातील च-हाटा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ट्रेनी शिक्षिकेची निवड प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने शासनाचे नियम डावलून केली आहे. संबंधित प्रकरणात गटशिक्षणाधिकारी यांनी लेखी आदेश देऊनही नियुक्ती न दिल्याने श्रीमती पिंगळे निकिता बाळु यांचे नातेवाईक आणि सहकारी यांनी काल दि.२० शुक्रवार रोजी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात धरणे आंदोलन सुरू केले होते. शिक्षणाधिकारी यांनी संबंधित आंदोलन प्रकरणी गटशिक्षणाधिकारी बीड यांना लेखी आदेश देऊनही दुपारपर्यंत कोणीही आंदोलनाची दखल घेतली नाही.आंदोलनकर्ते यांच्या विनंतीवरून सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन भगवान फुलारी ,शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद साधल्यानंतर विस्तार अधिकारी उत्तमराव पवार यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन संपूर्ण चौकशी करून मंगळवार पर्यंत अहवाल देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

मुख्याध्यापिका परदेशी यांनी नियमबाह्य निवड केली असुन त्यांच्यावर कारवाई करून मला न्याय द्यावा :- पिडीत ट्रेनी शिक्षिका निकिता पिंगळे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा च-हाटा येथे मुख्याध्यापिका परदेशी यांनी मला डावलुन नियमबाह्यपणे ईतर उमेदवाराची निवड केली.संबधित प्रकरणी गटशिक्षणाधिकारी खान यांना तक्रार केल्यानंतर त्यांनी चौकशी करून माझी शैक्षणिक पात्रता डीएड व एमएससीआयटी कागदपत्रे पाहुन माझी नियुक्ती करण्याचे आदेश देऊनही मुख्याध्यापिका परदेशी यांनी नियुक्ती केली नाही.शासनाच्या आदेशाप्रमाणे इन कॅमेरा निवड केली नाही तसेच उमेदवारांना एमएससीआयटी बंधनकारक असतानाही नियम डावलून ईतर उमेदवारांला नियुक्ती दिली. प्रशासनाने योग्य निर्णय घेऊन मला न्याय द्यावा अशी मागणी पिडीता निकिता पिंगळे यांनी सांगितले.

न्याय न मिळाल्यास शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनास बसणार :- संदिप उबाळे गटशिक्षणाधिकारी खान यांनी निकिता पिंगळे यांची बीड. डीएड.,एमएससीआयटी हि शैक्षणिक पात्रता पाहुन नियुक्ती करण्याचे लेखी आदेश मुख्याध्यापिका परदेशी यांना दिले.परंतु त्यांचे आदेश न पाळता परदेशी यांनी बीएससी असलेल्या व एमएससीआयटी पात्रता नसणा-या उमेदवाराची नियुक्ती करत शासकीय आदेशाचे उल्लंघन केले आहे.संबधित प्रकरणात मुख्याध्यापिकेवर कारवाई करण्यात यावी आणि योग्य उमेदवाराची निवड करण्यात यावी यासाठी धरणे आंदोलन सुरू केले होते. दुपारपर्यंत शासनाचा प्रतिनिधी आंदोलन स्थळी न आल्याने आम्ही डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना बोलावून घेतले. त्यांनी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड भगवान फुलारी यांच्याशी फोनवरून संवाद साधल्यानंतर शिक्षण विस्तार अधिकारी उत्तमराव पवार यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन मंगळवार पर्यंत चौकशी अहवाल देऊन दोर्षीवर कारवाई करण्यात येईल या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मंगळवार पर्यंत दोर्षीवर कारवाई न झाल्यास शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयासमोर आंदोलनात आंदोलन करण्यात येईल. यावेळी आंदोलनात युनुस शेख,सुदाम तांदळे,संदिप उबाळे, मनोज उबाळे, बलभीम उबाळे, रमेश उबाळे, रणजित उबाळे, विलास उबाळे, राजेश उबाळे, विनोद उबाळे सहभागी होते.बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत नियुक्ती मध्ये स्थानिक पुढा-यांचा मनमानी कारभार:- डॉ.गणेश ढवळे महाराष्ट्र राज्य युती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवुन ट्रेनी शिक्षक , पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, आरोग्य विभाग अशा अनेक शासकीय व संस्थेच्या जागेवर सहा महिन्यांकरीता काम करण्याची संधी दिली. परंतु बहुतांश ठिकाणी स्थानिक पुढ-यांनी जवळच्या लोकांच्या नियुक्ती साठी संबंधित विभागाच्या अधिका-यांवर दबाव आणून शासकीय आदेश डावलून मनमानी कारभार केल्यामुळे ख-या शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे. असे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**मो.नं.८१८०९२७५७२**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २२ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com





माननीय पंकजाताई मुंडे यांचे नागपूर या ठिकाणी स्वागत करताना नवनाथ शिराळे पाटील जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख इत्यादी पदाधिकारी हजर होते

# राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर; कोणतं खातं कोणाकडे असणार.?. वाचा संपूर्ण यादी.!

## राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर झालं आहे.

**बीड,/प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर; कोणतं खातं कोणाकडे असणार.?. वाचा संपूर्ण यादी.! • मुंबई : राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार देखील पार पडला. त्यानंतर हिवाळी अधिवेशही झालं. मात्र, मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन आठवडा झाला तरी खातेवाटप झालं नव्हतं. मात्र, अखेर आज राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर झालं आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखातं असणार आहे, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थखातं असणार आहे. • कॅबिनेट मंत्री • 1. चंद्रशेखर बावनकुळे - महसूल • 2. राधाकृष्ण विखे पाटील – जलसंपदा ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास) • 3. हसन मुश्रीफ - वैद्यकीय शिक्षण • 4. चंद्रकांत पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाजमंत्री • 5. गिरीश महाजन – आपत्ती व्यवस्थापन (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन • 6. गुलाबराव पाटील – पाणीपुरवठा • 7. गणेश नाईक – वन • 8. दादाजी भुसे - शालेय शिक्षण • 9. संजय राठोड - माती व पाणी परीक्षण • 10. धनंजय मुंडे – अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण • 11. मंगलप्रभात लोढा – कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन • 12. उदय सामंत – उद्योग व मराठी भाषा • 13. जयकुमार रावल – विपणन, प्रोटोकॉल • 14. पंकजा मुंडे – पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन • 15. अतुल सावे - ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, अक्षय ऊर्जा • 16. अशोक उईके - आदिवासी विकास मंत्रालय • 17. शंभूराज देसाई - पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय • 18. आशिष शेलार – माहिती व तंत्रज्ञान • 19. दत्तात्रय भरणे - क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय • 20. अदिती तटकरे - महिला व बालविकास • 21. शिवेंद्रराजे भोसले - सार्वजनिक बांधकाम • 22. माणिकराव कोकाटे - कृषी • 23. जयकुमार गोरे – ग्रामविकास, पंचायत राज • 24. नरहरी झिरवाळ – अन्न व औषध प्रशासन • 25. संजय सावकारे – कापड • 26. संजय शिरसाट - सामाजिक न्याय • 27. प्रताप सरनाईक - वाहतूक • 28. भरत गोगावले – रोजगार हमी, फलोत्पादन • 28. भरत गोगावले - रोजगार हमी, फलोत्पादन • 29. मकरंद पाटील - मदत व पुनर्वसन • 30. नितेश राणे – मत्स्य आणि बंदरे • 31. आकाश फुंडकर - कामगार • 32. बाबासाहेब पाटील – सहकार • 33. प्रकाश आबिटकर - सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण • राज्यमंत्री • 34. माधुरी मिसाळ – सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, वैद्यकीय शिक्षण • 35. आशिष जयस्वाल – अर्थ आणि नियोजन, विधी व न्याय • 36. मेघना बोर्डीकर - सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा • 37. इंद्रनील नाईक - उच्च आणि तंत्र शिक्षण, आदिवासी विकास आणि पर्यटन

# पिंपळवंडी येथे गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी

पिंपळवंडी । प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे दि.२०/१२/२०२४ शुक्रवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय,जिल्हा परिषद शाळा तसेच,गोकुळ राऊत यांच्या हॉटेलमध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.यावेळी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात येऊन प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.यावेळी डी.के.पवार सर,बाबासाहेब राऊत,संतोष वाघमारे,जालिंदर पवार,गोकुळ राऊत,राजू माळी,पत्रकार के.टी.पवार,अतुल राऊत,राहुल पवार,नागेश शहाणे,श्रीकांत उकांडे,जयसिंग जरे,बद्री पवार,कृष्णा पवार,मयूर राऊत व ग्रामस्थ उपस्थित होत

# नवीन पोलीस अधीक्षक यांचे बीड जिल्ह्यात स्वागत!

## हिवाळी अधिवेशनात बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाचा मुद्दा मांडला; आंदोलनकर्त्यांनी मानले आभार

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी बदली करून नवीन पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कांवत हे रुजू होत आहेत. बीड जिल्ह्यात बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेता हा निर्णय घेत असल्याची घोषणा मुख्यंत्र्यांनी विधिमंडळात केली.



आता नवीन पोलीस अधिक्षकांकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा आहेत. बीड जिल्ह्यातील आणि परळी शहर व तालुक्यातील अवैध धंद्यांना पायबंद घालावा ज्यामुळे गुन्हेगारी कमी होईल अशी अपेक्षा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केली आहे.

बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांत अनेक विचित्र घटना घडल्याने जिल्ह्याचे नाव देशभरात बदनाम झाले आहे. गुन्हेगारांना कायद्याचा अजिबात धाक राहिलेला नाही. खून, दरोडे, चो–यामा–या, अवैध दारू विक्री, अवैध गुटखा, वाळू माफिया, तसेच अनेक प्रकारचे अवैध धंदे चालत आहेत. यावर नावे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी विशेष लक्ष घालून क्लीनअप मोहीम हाती घ्यावी तसेच परळी आणि

# च–हाटा रोडवरील पालवण फाट्यावरील रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरु ; जनतेचे २ कोटी ७० लाख रुपयाचा चुराडा ; जबाबदार अधिका–यावर कारवाई करा :- डॉ.गणेश ढवळे




बीड:– अहिल्यानगर –बीड– परळी या रेल्वेचे स्वप्न बीडकरांनी गेल्या अनेक वर्षांपासून जागवले आहे. अनेक घडामोडी मागच्या काळात झाल्या.मात्र रेल्वे कधी येणार याबाबत काहीच सांगता येत नव्हते मात्र गेल्या ५ वर्षांमध्ये रेल्वेच्या कामाला प्रचंड गती मिळाली असुन बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण २०२५ अखेरीस पुर्ण होण्याची चिन्हे दिसत आहेत. अहिल्यानगर– बीड–परळी रेल्वेमार्गाची अंमळनेर ते विघनवाडी अशी ३३.१२ किलोमीटरची चाचणी ९ आगस्ट २०२४ रोजी पुर्ण झाल्यानंतर आता शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते बीड अशा ३५ किलोमीटर अंतरापैकी २२ किमीचे नवगण राजुरी गावापर्यंत रेल्वेचे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे.डिसेंबर २०२४ अखेर रेल्वेची चाचणी होणार आहे.पुढच्या टप्प्यातील नवगण राजुरी ते बीड अशा १३ किलोमीटर अंतरात रेल्वे रूळ अंथरण्याचे काम सध्या प्रगती पथावर असुन जानेवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात या मार्गावरील सुरक्षेची चाचणी घेण्यात येणार आहे. मात्र बीड तालुक्यातील च–हाटा रोडवरील पालवण फाट्यावरील ८–९ वर्षांपूर्वी तब्बल २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या रेल्वे पुलाचे सध्या क्रासमॅच होत असुन सरळ रेषेत नसल्याने हा रेल्वेपुल पाडण्याचे सध्या काम सुरू असुन जनतेच्या करातुन तब्बल २ कोटी ७० लाठ रूपये बांधण्यात आलेल्या रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू असुन संबंधित प्रकरणात जबाबदार अभियंता व ईतर आधिका–यांवर कारवाई करण्यात येऊन त्यांच्या कडुन नुकसान भरपाई घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस च–हाटकर ,सुदाम तांदळे व शिवशर्मा शेलार यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

# थंडीत मायेची उब देण्यासाठी ऊसतोड मजूरांना ब्लँकेटचे वाटप बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांचा स्तुत्य उपक्रम



गेवराई : लोक इच्छा न्युज थंडीत मायेची उब देण्यासाठी बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांच्या पुढाकारातून कोल्हेर रोड, गेवराई येथे ऊसाच्या फडात जावून १०१ ऊसतोड मजूर कामगारांना युवा नेते शिवराज दादा पवार यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. गेवराईचे लोकनेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांच्या पुढाकारातून शनिवार दि.२१ डिसेंबर रोजी कोल्हेर रोड, गेवराई येथे ऊसाच्या फडात जावून थंडीत मायेची उब देण्यासाठी ऊसतोड मजूरांना युवा नेते शिवराज पवार यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, भाजपा युवा नेते कृष्णा ढाकणे, रमेश राठोड ,परमेश्वर राठोड , लक्ष्मण मुंडे , निजामभाई शेख, समाधान मस्के, कृष्णा पाटोळे, दाऊदभाई पठाण, दादासाहेब राठोड, महेश सौंदरमल, फाहद चाऊस, प्रकाश पवार, सुरेश राठोड, आकाश पवार, बबनराव राठोड , अनिल राठोड , भरत गायकवाड , अमोल राठोड यांच्यासह ऊसतोड कामगार उपस्थित होते. या उपक्रमांमुळे ऊसतोड कामगारांना थंडीपासून बचाव करण्यासाठी मदत मिळाली आहे.

# प्रवाशांनो सावधान! तीन वर्षांत इतक्या हजार स्मार्टफोनवर डल्ला,



ठाण्यातील प्रवाशांच्या जीवावर मोबाईल चोरटे मज्जा मारताय, असं म्हटलं तर तुम्हाला विश्वास बसणार नाही. पण प्रवाशांच्या निष्काळजीपणामुळे मोबाईल चोरट्यांचं नशीब फळफळलं आहे. ठाणे ते दिवा, ऐरोली या प्रवासादरम्यान खिसा कापण्याच्या नाही तर मोबाईल चोरीच्या सर्वाधिक घटना घडल्या आहेत. याविषयीची आकडेवारी धक्कादायक आहे. ही आकडेवारी पाहीली तरी प्रवाशांचा निष्काळजीपणा समोर येईल. या रेल्वे मार्गावर सर्वाधिक मोबाईल चोरी गेल्याचे समोर आले आहे. तेव्हा राहा सावध, होऊन नका सावज, तुमच्या निष्काळजीपणावर चोरटे मज्जा मारताय हे विसरू नका.४००० मोबाईलची चोरीप्रवाशांचा निष्काळजीपणा चोरट्यांसाठी फायदेशीर ठरला आहे. ठाणे ते दिवा ऐरोली रेल्वे स्थानकात चो–्या वाढल्या आहेत. ३ वर्षात ४००० मोबाईलची चोरी गेल्याचे समोर आले आहे. मोबाईल चोरीला गेल्यावर त्याची अनेक जण फिर्याद देतात. तर काही जण काहीच फायदा होणार नाही म्हणून साधी तक्रार सुद्धा दाखल करत नाहीत. पण ही आकडेवारी धक्कादायक आहे. वर्षाला सरासरी हजार मोबाईल चोरीला गेल्याचे समोर येत आहे. या परिसरात चोरांचा सुळसुळाट असल्याचे समोर येत आहे.

# वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलीस स्टेशनला दिले निवेदन.

## संपादक शिरसाट यांना धमकी देणा–या महिला कर्मचा–यावर निलंबनाची कारवाई करा.

वडवणी / प्रतिनिधी

डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य सदस्य तथा दैनिक मवास्तवफ्चे संपादक जितेंद्र सिरसाट यांना धमकी देणा–या बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला कर्मचा–यावर कारवाई करत या धमकीमागील मास्टरम ाईडचा शोध घ्यावा अशी मागणी मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणीच्या वतीने करण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असे की बीड येथील डिजिटल मीडियाचे राज्य सदस्य तथा दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांना बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी असलेल्या आगाव मॅडम नामक एका महिलेने दूरध्वनीवरून फोन करून धमकी दिली आहे. त्यांना उचलून आणण्याची भाषा केली आहे. या धमकीमुळे बीड जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रामध्ये खळबळ उडाली आहे. जितेंद्र सिरसाट हे मागील पंचवीस वर्षापासून बीड येथे पत्रकारिता करत आहेत. त्यांचे स्वतःचे वास्तव हे दैनिक असून त्या दैनिकाचे ते संपादक आहेत. त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वसामान्य शेतकरी शेतम जुरांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. गोरगरिबांना न्याय देण्यासाठी त्यांनी अनेक वेळा आपल्या लेखणीतून आवाज उठवलेला आहे. शासन, प्रशासनाला भानावर आणण्यासाठी त्यांनी आपल्या लेखणीची धार कडक ठेवून प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. मात्र खरी पत्रकारिता करत असताना त्यांनी कधीही आपल्या पत्रकारितेच्या माध्यम ातून कोणालाही जाणीवपूर्वक त्रास दिलेला नाही. सामाजिक जीवनामध्ये ते अत्यंत सुस्वभावी व्यक्तिमत्व आहेत. प्रत्येक नागरिकांसोबत त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. कधीही कोणाला बोलताना मनमिळावू पणाने ते बोलतात. अशा हसतमुख असणा–या पत्रकाराला शासकीय सेवेतील अधिकारी असलेल्या एका महिलेने दूरध्वनीवरून धमकी दिल्याचे ऑडिओ क्लिप ऐकायला मिळाली आहे. जितेंद्र सिरसाट यांना सदर महिला अर्वाच्च भाषेत बोलत असताना जितेंद्र सिरसाट त्यांना अत्यंत नम्रपणे बोलत आहेत. तरीही त्यांना धमकी देण्यात आली. जितेंद्र सिरसाट यांच्या सारख्या नामांकित पत्रकाराला जर धमकी मिळत असेल तर बीड जिल्ह्यातील शेकडो पत्रकारांना खूप मोठा धोका आहे. त्यामुळे या बाबीची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांनी तात्काळ दखल घ्यावी आणि या बाबीची सखोल चौकशी करून या प्रकरणात नेमकं सदर महिलेच्या पडद्याआडून कोण कोण चेहरे आहेत याचा शोध घ्यावा अशी मागणी वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशनला दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.




यावेळी डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिलराव वाघमारे,ज्येष्ठ पत्रकार सुधाकर काका पोटभरे,मानवी हक्क अभियानचे वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले यांनी उपस्थित राहुन पाठिंबा दिला. मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुका अध्यक्ष सतीषराव सोनवणे,सचिव महेश सदरे. पत्रकार धम्मपाल डावरे,पत्रकार ओमप्रकाश साबळे,पत्रकार वाजेद पठाण,पत्रकार हरी पवार, पत्रकार अतुल जाधव,पत्रकार विजय राऊत सह आदी पत्रकार यावेळी उपस्थित होते..

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com